महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई -४०००३२

दूरध्वनी क्र .०२२-२२०२३३२६ Email ID : bhagyashreej.deore@mah.gov.in

गोपनीय

क्रमांक :- मविन्या १२२३/प्र.क्र.२१/वि.प्र.-१ दिनांक :- १३ एप्रिल, २०२३.

प्रति,

मा. महाप्रबंधक,
उच्च न्यायालय,मुंबई.

विषय :- महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणाच्या आस्थापनेवरील अध्यक्ष व न्यायिक सदस्यांची रिक्त पदे भरण्याबाबत..

माननीय महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, खालील तक्त्यातील महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणाच्या आस्थापनेवरील न्यायिक सदस्य यांचा सदर पदावरील कार्यकाळ त्यांच्या नावासमोर दर्शविल्या दिनांकास संपुष्टात आला आहे.

| अ. क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम | पदभार स्वीकारल्याचा दिनांक | पदभार संपुष्टात आल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.बद्रीप्रसाद रामविलास गुप्ता | न्यायिक सदस्य | १४/०३/२०२२ | ११/०४/२०२३ |

तसेच पुढील तक्त्यातील महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणाच्या आस्थापनेवरील अध्यक्ष व न्यायिक सदस्य यांचा सदर पदावरील कार्यकाळ त्यांच्या नावासमोर दर्शविल्या दिनांकास संपुष्टात येत आहे.

| अ. क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम | पदभार स्वीकारल्याचा दिनांक | पदभार संपुष्टात येत असल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. सुहास व्यंकटराव माने | अध्यक्ष | ०६/०८/२०२१ | ०५/०८/२०२३ |
| २ | श्री. राजेंद्रकुमार रघुनाथ वैष्णव | न्यायिक सदस्य | ०४/०८/२०२१ | २२/०५/२०२३ |
| ३. | श्री.चंद्रकांत पेंटय्या गड्डम | न्यायिक सदस्य | ०९/०८/२०२१ | १६/०७/२०२३ |
| ४. | श्री.विवेक विष्णुपंत विद्वांस | न्यायिक सदस्य | २७/०९/२०२१ | २८/०८/२०२३ |
| ५. | श्री.विनय कल्याण यावलकर | न्यायिक सदस्य | ०९/११/२०२२ | ०४/०३/२०२४ |

न्यायाधिकरणाकडे असलेल्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा होण्याच्या दृष्टीने न्यायाधिकरणातील रिक्त पदे तातडीने भरणे आवश्यक आहे.

श्री.बद्रीप्रसाद रामविलास गुप्ता यांचा न्यायिक सदस्य पदाचा कार्यभार दि.१४/०३/२०२३ रोजी संपुष्टात आला आहे. सदर पदावर न्यायिक सदस्यांची मा. उच्च न्यायालयाकडून शिफारस करुन घेऊन तात्काळ नियुक्ती करणे आवश्यक आहे. तसेच १-अध्यक्ष व उर्वरित ३ न्यायिक सदस्यांचा कार्यभार माहे मार्च, २०२४ पर्यंत संपुष्टात येत आहे. यास्तव सदर पदांवरही त्या-त्यावेळी सदस्यांची नेमणूक करण्याकरिता न्यायिक सदस्यांची मा. उच्च न्यायालयाकडून शिफारस करुन घेणे क्रमप्राप्त आहे.

श्री. सुहास व्यंकट माने,अध्यक्ष,महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण, मुंबई यांनी दिनांक ०६/०४/२०२३ च्या अर्जान्वये त्यांची नियुक्ती दि.०३/०४/२०२६ पर्यंत चालू ठेवण्याची विनंती केली असून, सदर अर्ज आवश्यक योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेऊन उपरोक्त अध्यक्ष व न्यायिक सदस्यांची पदे भरण्याच्या अनुषंगाने मुल्यवर्धीत कर अधिनियम २००२ मधील कलम ११ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा व महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर नियम २००५ मधील तरतुदीनुसार व त्यानुषंगाने दि.३१ मार्च, २०१८ व दि.१२ सप्टेंबर, २०१८ ची अधिसूचना आणि त्यानुषंगाने दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८ रोजी काढण्यात आलेले शुध्दीपत्र विचारात घेऊन अध्यक्ष व न्यायिक सदस्य पदावर नियुक्तीसाठी पात्र न्यायिक सदस्यांची नियुक्ती करावयाची आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे अध्यक्ष व न्यायिक सदस्य पदावर नियुक्तीसाठी पात्र न्यायिक सदस्यांची मा.उच्च न्यायालयाकडून शिफारस प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास कळविण्याबाबत आपणास विनंती करण्यात येत आहे, जेणेकरुन मा.उच्च न्यायालयाने शिफारस केलेल्या क्रमानुसार न्यायाधिकरणातील रिक्त झालेली पदे क्रमशः भरणे सोईचे होईल.

आपली,

भाग्यश्री देवरे

(भाग्यश्री देवरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत:- वरीलप्रमाणे

प्रत:-

१. प्रधान सचिव व विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२. निवडनस्ती.

RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक १८(२) शनिवार, मार्च ३१, २०१८/चैत्र १०, शके १९४० [redacted]

**असाधारण क्रमांक ३५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.**— महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. .. .. .. .. | पृष्ठे १-५ |

दिनांक २८ मार्च २०१८ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**राजेन्द्र ग. भागवत,**
प्रभारी सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **" महाराष्ट्र शासन राजपत्रात "** दिनांक ३१ मार्च २०१८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकोणसत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

**प्रारंभिक.**

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे व सुधारणा) अधिनियम, २०१८, असे म्हणावे.

(२) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त तो, दिनांक १ एप्रिल २०१८ पासून अंमलात येईल.

प्रकरण दोन

**महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ याची सुधारणा.**

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ३ ची सुधारणा. २. महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ (या प्रकरणात, यापुढे ज्याचा निर्देश "व्यवसाय कर अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मधील, पोट-कलम (२) मध्ये "कोणत्याही वर्गाखाली येणारी" या मजकुराऐवजी, "कोणत्याही वर्गांखाली येणारी, मर्यादित दायित्व भागीदारी अधिनियम, २००८ अन्वये नोंदणी केलेली मर्यादित दायित्व भागीदारीसह, मात्र" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. १९७५ चा महा. १६. २००९ चा ६.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ यामध्ये नवीन कलम ४क समाविष्ट करणे. ३. व्यवसाय कर अधिनियमाच्या कलम ४ब नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

कराची वसुली व त्याचा भरणा. "४क. (१) राज्य शासनास, वेळोवेळी **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, आणि त्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्ती व निर्बंधांना अधीन राहून, वस्तूंच्या पुरवठ्यासंबंधात किंवा, यथास्थिति, सेवांच्या पुरवठ्यासंबंधात किंवा इतर कोणत्याही प्रयोजनाच्या संबंधात, कोणतीही रक्कम स्वीकारण्यास, नावनोंदणी केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून अथवा नावनोंदणी करण्यासाठी पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून कराची रक्कम गोळा करण्यास पात्र असेल अशा कोणत्याही अधिसूचित व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गांना (यात यापुढे, या कलमात, ज्यांचा निर्देश "कर वसुलीकार" असा करण्यात आला आहे) फर्मावता येईल.

(२) कर वसुलीकार, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने, शासकीय कोषागारात अशी रक्कम भरील. या कलमान्वये अशा प्रकारे भरलेली रक्कम ही, जिच्याकडून कराच्या रूपाने उक्त रक्कम वसूल केलेली आहे, अशा व्यक्तीच्या वतीने भरली असल्याचे मानण्यात येईल.

(३) मालक आणि कर्मचारी यांच्या संबंधातील, या अधिनियमाखालील सर्व तरतुदी ह्या, पोट-कलम (१) अन्वये कर वसूल करण्यास पात्र असलेल्या व्यक्तीस व जिच्याकडून असा कर वसूल केला जातो अशा व्यक्तीस, योग्य त्या फेरफारांसह, लागू होतील.".

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ८ ची सुधारणा. ४. व्यवसाय कर अधिनियमाच्या कलम ८ मध्ये, पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील :—

"(३) राज्य शासनास, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्ती व निर्बंधांना अधीन राहून, नावनोंदणी केलेल्या व्यक्तीसाठी, अनुसूची एक मध्ये लागू असलेल्या दरापेक्षा कमी दराने, कर आगाऊ भरण्याची योजना करता येईल.

(३अ) पोट-कलम (३) अन्वये काढलेल्या अधिसूचनेनुसार, जिने अशी रक्कम आगाऊ भरलेली असेल अशा नावनोंदणी केलेल्या व्यक्तीच्या दायित्वात, अनुसूची एक मध्ये तरतूद केलेल्या, कराच्या दरात कोणतीही वाढ किंवा घट झाल्यामुळे, बदल होणार नाही.".

५. व्यवसाय कर अधिनियमाच्या कलम ११ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :— सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ११ ची सुधारणा.

२०१७ चा महा. ४३. " ११. या अधिनियमाखालील देय रकमांच्या वसुलीसाठी, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ च्या कर वसुलीसंबंधातील तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.". कर वसुली.

६. व्यवसाय कर अधिनियमाच्या कलम १२ मधील, पोट-कलम (१) च्या खंड (ब) मध्ये, " आणि व्यवसाय कर अधिकारी हे " या मजकुराऐवजी, " , व्यवसाय कर अधिकारी व राज्य शासनास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, असे इतर अधिकारी आणि व्यक्ती (अशा पदनामांसह) या," हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम १२ ची सुधारणा.

७. व्यवसाय कर अधिनियमाच्या कलम २६ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ मध्ये नवीन कलम २६अ समाविष्ट करणे.

" **२६अ.** (१) या अधिनियमाची अधिक चांगल्या रीतीने अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनांसाठी, तसे करणे आवश्यक आहे असे आयुक्ताला वाटले तर, त्यास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाद्वारे किंवा त्या संबंधात हाताळण्यात येईल अशा कोणत्याही बाबीसंबंधी आकडेवारी गोळा करण्यात यावी, असा निदेश देता येईल. आकडेवारी गोळा करण्याचा अधिकार.

(२) असा निदेश देण्यात आल्यानंतर, आयुक्ताला किंवा याबाबत आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि आवश्यक वाटल्यास कोणत्याही वृत्तपत्रामध्ये नोटीस प्रसिद्ध करून, किंवा व्यक्तींचे लक्ष नोटिशीकडे वेधण्यास आयुक्ताच्या व उक्त अधिकाऱ्याच्या मते जी रीत अधिक सोयीस्कर असेल अशा अन्य रीतीने, ज्यासंबंधी आकडेवारी गोळा करावयाची असेल अशा कोणत्याही बाबीसंबंधी अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी माहिती किंवा विवरणे सादर करण्यास सर्व व्यक्तींना सांगता येईल. ज्या नमुन्यात व ज्या अधिकाऱ्याकडे अशी माहिती किंवा विवरणे सादर करावयाची असतील तो नमुना व ते अधिकारी, त्यामध्ये जो तपशील अंतर्भूत असावयास पाहिजे तो तपशील, आणि ज्या कालावधीत अशी माहिती किंवा विवरणे सादर करावयाची असतील तो कालावधी विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(३) जी व्यक्ती, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत, या कलमात तरतूद केल्याप्रमाणे माहिती सादर करण्यास कसूर करील, ती कोणतीही व्यक्ती, शास्ती म्हणून दहा हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम भरण्यास आणि दोन महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी कसूर करण्याचे चालू राहिल्यास, असे कसूर करणे चालू राहिल्याच्या प्रत्येक दिवसासाठी शंभर रुपये इतक्या आणखी शास्तीस पात्र असेल.".

८. व्यवसाय कर अधिनियमास जोडलेल्या अनुसूची एक मध्ये,— सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या अनुसूची एक ची सुधारणा.

(१) नोंद १८ नंतर, पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईल :—

२००९ चा ६. " १८अ मर्यादित दायित्व भागीदारी अधिनियम, २००८ अन्वये . . नोंदणी केलेली मर्यादित दायित्व भागीदारी. दरसाल २,५००"

(२) नोंद १९ ऐवजी, पुढील नोंद दाखल करण्यात येईल :—

" १९ कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा आजीविका यामध्ये गुंतलेला,–

१९३२ चा ९. (अ) भागीदारी संस्थेचा (भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ अन्वये नोंदणीकृत असो वा नसो.), प्रत्येक भागीदार, दरसाल २,५००.

२००९ चा ६. (ब) मर्यादित दायित्व अधिनियम, २००८ अन्वये नोंदणीकृत मर्यादित दायित्व भागीदारीचा, प्रत्येक भागीदार. दरसाल २,५००.".

प्रकरण तीन

## महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ याची सुधारणा.

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ११ ची सुधारणा.

९. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (या प्रकरणात, यापुढे ज्याचा निर्देश " मूल्यवर्धित कर अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ११ मध्ये, पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील आणि ती दिनांक १ एप्रिल २०१७ पासून दाखल करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल :— २००५ चा महा. ९.

" (३) न्यायाधिकरणाचा प्रत्येक सदस्य हा,—

(एक) जो उच्च न्यायालयाचा न्यायाधीश आहे किंवा होता, किंवा

(दोन) जो जिल्हा न्यायाधीश आहे किंवा होता, किंवा

(तीन) जो जिल्हा न्यायाधीश म्हणून नियुक्तीसाठी अर्हताप्राप्त आहे आणि ज्याने दहा वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी वर्षे न्यायिक पद धारण केले आहे, किंवा

(चार) (क) ज्याने दोन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या सलग कालावधीसाठी विक्रीकर सहआयुक्त किंवा यथास्थिति, राज्य कर सहआयुक्त पदापेक्षा कमी दर्जा नसलेले पद धारण केले आहे, आणि ज्याने न्यायिकवत कामकाज केले आहे, किंवा

(ख) जो सेवानिवृत्त झाला आहे आणि ज्याने आपल्या सेवानिवृत्तीपूर्वी विक्रीकर सहआयुक्त किंवा, यथास्थिति, राज्यकर सहआयुक्त पदापेक्षा कमी दर्जा नसलेले पद धारण केले होते आणि ज्याने आपल्या सेवानिवृत्तीपूर्वी न्यायिकवत कामकाज केले होते, किंवा

(ग) जो सेवानिवृत्त झाला आहे आणि ज्याने आपल्या सेवानिवृत्तीपूर्वी न्यायधिकरणाचे सदस्य म्हणून पद धारण केले होते,

अशी व्यक्ती असेल.

**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, "न्यायिकवत कामकाज" यामध्ये निर्धारण, लेखापरीक्षा किंवा अपीलविषयक कामकाज यांचा समावेश होईल.

(३क) (क) खंड (एक), (दोन) किंवा (तीन) मध्ये विनिर्दिष्ट केलेले सदस्य हे, मुंबई उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करून, राज्य शासनाकडून नियुक्त अथवा पुनर्नियुक्त करण्यात येतील.

(ख) खंड (चार) मध्ये विनिर्दिष्ट केलेला सदस्य हा, विहित रीतीने घटित केलेल्या निवड समितीच्या शिफारशींवरून, राज्य शासनाकडून नियुक्त किंवा पुनर्नियुक्त करण्यात येईल.

(३ख) न्यायाधिकरणाच्या सदस्याचा पदावधी हा, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल. तो सदस्य, विहित करण्यात येईल किंवा राज्य शासन, त्याच्या प्रकरणी विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील, अशा कालावधीसाठी पद धारण करील.".

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ३१ ची सुधारणा.

१०. मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम ३१ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मध्ये, खंड (ख) मधील उप-खंड (एक) मध्ये, " उक्त कार्यकंत्राट पूर्ण करण्यासाठी " या मजकुरानंतर, " ३१ डिसेंबर २०१८ पर्यंत " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (४) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल आणि ते १ जुलै २०१७ पासून जादा दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल,—

" परंतु, १ जुलै २०१७ रोजी किंवा त्यानंतर सुरू होणाऱ्या आणि ३१ डिसेंबर २०१८ रोजी संपणाऱ्या कालावधीमध्ये या कलमाच्या तरतुदींनुसार नियोक्त्याने राज्य शासनाकडे जमा केलेल्या कोणत्याही रकमेचा, नियोक्त्याला पुरवठा करणाऱ्या व्यक्तीला किंवा, संबंधित उप कंत्राटदाराला (कोणताही असल्यास) विहित केलेल्या पद्धतीने आणि विहित शर्तीच्या अधीन राहून, जमा रकमेचा दावा करता येईल.".

११. मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम ३२क मधील, पोट-कलम (२) च्या स्पष्टीकरणामध्ये, "जी देय रक्कम शंभर रुपये किंवा त्यापेक्षा कमी असेल तर, आयुक्त ती," या मजकुराऐवजी, "प्रति आदेश किंवा यथास्थिति, प्रति कालावधी कराची रक्कम पाचशे रुपये किंवा त्यापेक्षा कमी असेल अशा कराची रक्कम आणि त्यावर देय असलेले व्याज, आयुक्त," हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ३२क ची सुधारणा.

१२. मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम ५९ मधील पोट-कलम (१) च्या परंतुकामध्ये, "ठाणे व रायगड जिल्हा," या मजकुराऐवजी, "ठाणे, पालघर व रायगड जिल्हा," हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ५९ ची सुधारणा.

१३. मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम ६१ मध्ये, पोट-कलम (१) नंतर, स्पष्टीकरण— एक पूर्वी, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ६१ ची सुधारणा.

"परंतु, २०१७-१८ या वर्षाकरिता, कलम १६ च्या पोट-कलम (६क) अन्वये नोंदणी रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात आलेल्या ज्या व्यापाऱ्याच्या,—

(क) विक्रीची उलाढाल आणि राज्याबाहेर स्थित असलेल्या, त्याच्या किंवा त्याच्या अभिकर्त्याच्या किंवा प्रकर्त्याच्या धंद्याच्या इतर कोणत्याही ठिकाणी विक्रीच्या कारणांशिवाय हस्तांतरित केलेल्या मालाचे मूल्य यांची एकूण बेरीज, किंवा

(ख) खरेदीची उलाढाल,

पंचवीस लाख रुपयांपेक्षा अधिक असेल तर, अशा प्रत्येक व्यापाऱ्याला या पोट-कलमाच्या तरतुदी लागू होतील.".

१४. मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम ८५ मधील पोट-कलम (२) मध्ये,—

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ८५ ची सुधारणा.

(१) खंड (झ) मधील, "आदेश वगळून," या मजकुरानंतर "किंवा" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(२) खंड (झ) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :-

"(ञ) कलम २६ख अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेद्वारे आयुक्ताला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या आधारे, त्याने प्रसिद्ध केलेला कोणताही आदेश.".

## प्रकरण चार

## महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ याची सुधारणा.

२०१७ चा महा. ४३.

१५. महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ याच्या कलम ३ मध्ये, खंड (च) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येतील :

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३ ची सुधारणा.

"(च) राज्य कर सहायक आयुक्त,

(च-१) राज्य कर अधिकारी, आणि".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG /2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष ४, अंक २५(२)      शनिवार, मार्च ३१, २०१८/चैत्र १०, शके १९४०      पृ[redacted]

### असाधारण क्रमांक ५९

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (*3*) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Tax Laws (Levy and Amendment) Act, 2018 (Mah. Act No. XXVI of 2018), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA G. BHAGWAT,
I/c. Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XXVI OF 2018.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 31st March 2018.)*

An Act further to amend certain tax laws in operation in the State of Maharashtra.

WHEREAS it is expedient further to amend certain tax laws in operation in the State of Maharashtra, for the purposes hereinafter appearing ; it is hereby enacted in the Sixty-ninth Year of the Republic of India as follows :—

### CHAPTER I

PRELIMINARY.

**1.** (*1*) This Act may be called the Maharashtra Tax Laws (Levy and Amendment) Act, 2018. Short title and commencement.

(*2*) Save as otherwise provided in this Act, it shall come into force with effect from the 1st April 2018.

## CHAPTER II

### AMENDMENTS TO THE MAHARASHTRA STATE TAX ON PROFESSIONS, TRADES, CALLINGS AND EMPLOYMENTS ACT, 1975.

Amendment of section 3 of Mah. XVI of 1975.

**2.** In section 3 of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975 (hereinafter, in this Chapter, referred to as "the Profession Tax Act"), in sub-section (*2*), after the words "Every person" the words and figures, "including limited liability partnership, registered under the Limited Liability Partnership Act, 2008 but" shall be inserted.

Mah. XVI of 1975.

6 of 2009.

Insertion of new section 4C in Mah. XVI of 1975.

**3.** After section 4B of the Profession Tax Act, the following section shall be inserted, namely :—

Collection and payment towards tax.

"**4C.** (*1*) The State Government may, from time to time, by notification published in the *Official Gazette* and subject to such conditions and restrictions as may be specified therein, require any notified person or class of persons (hereinafter, in this section referred to as "tax collector"), who is eligible to receive any amount towards supply of goods or, as the case may be, supply of services or towards any other purposes, to collect an amount towards tax from an enrolled person or a person, liable to be enrolled.

(*2*) The tax collector shall pay such amount into the Government Treasury in the manner specified in the notification. The amount so paid under this section shall be deemed to have been paid on behalf of such person, from whom the said amount by way of tax is collected.

(*3*) All the provisions under the Act, related to an employer and employee, shall *mutatis mutandis* apply to the person liable to collect the tax and the person from whom such tax is collected under sub-section (*1*).".

Amendment of section 8 of Mah. XVI of 1975.

**4.** In section 8 of the Profession Tax Act, for sub-section (*3*), the following sub-sections shall be substituted, namely :—

"(*3*) The State Government may, by notification published in the *Official Gazette*, subject to such conditions and restrictions, as may be specified therein, provide a scheme for payment of tax, in advance, at the rate, which shall be lower than the rate applicable to an enrolled person under Schedule I.

(*3A*) The liability of such enrolled person, who has paid such amount in advance, as per the notification issued under sub-section (*3*) shall not be varied due to any increase or decrease in the rate of tax, as provided in Schedule I.".

5. For section 11 of the Profession Tax Act, the following section shall be substituted, namely :— Amendment of section 11 of Mah. XVI of 1975.

Mah. XLIII of 2017. "**11.** The provisions of the Maharashtra Goods and Services Tax Act, 2017 regarding recovery of tax shall, *mutatis mutandis* apply for the recovery of dues under this Act.". Recovery of tax.

**6.** In section 12 of the Profession Tax Act, in sub-section (*1*), in clause (*b*), for the words "and Profession Tax Officers" the words and brackets ",Profession Tax Officers and such other officers and persons (with such designation) as the State Government thinks necessary" shall be substituted. Amendment of section 12 of Mah. XVI of 1975.

**7.** After section 26 of the Profession Tax Act, the following section shall be inserted, namely :— Insertion of new section 26A in Mah. XVI of 1975.

"**26A.** (*1*) The Commissioner may, if he considers that for the purposes of better administration of this Act, it is necessary so to do, he may, by notification in the *Official Gazette*, direct that statistics be collected relating to any matter dealt with, by or in connection with this Act. Power to collect statistics.

(*2*) Upon such direction being given, the Commissioner or any officer, authorized by the Commissioner in this behalf, may, by notification in the *Official Gazette* and if found necessary by notice in any newspaper or in such other manner as in the opinion of the Commissioner or the said officer, is best suited to bring the notice to the attention of persons, call upon all persons to furnish such information or returns, as may be specified therein, relating to any matter in respect of which statistics is to be collected. The form in which the officers to whom, such information or returns should be furnished, the particulars which they should contain and the period specified in the notification, within which such information or returns should be furnished, shall be such as may be specified therein.

(*3*) Any person, who fails to furnish information as provided in this section within the period specified in such notification, shall be liable to pay, by way of penalty, a sum not exceeding rupees ten thousand and in case of continuing default, for a period beyond two months, a further penalty of rupees one hundred for every day of such continuance.".

**8.** In the SCHEDULE I appended to the Profession Tax Act,— Amendment to SCHEDULE I of Mah. XVI of 1975.

(*1*) after entry 18, the following entry shall be inserted, namely :—

6 of 2009. "18A. Limited liability partnership, registered under the Limited Liability Partnership Act, 2008. 2,500 per annum." ;

(*2*) for entry 19, the following entry shall be substituted, namely :—

"19. (*a*) Each partner of a firm (whether registered or not under the Indian Partnership Act, 1932), 2,500 per annum. (9 of 1932.)

(*b*) Each partner of a limited liability partnership, registered under the Limited Liability Partnership Act, 2008, 2,500 per annum.". (6 of 2009.)

engaged in any profession, trade or calling.

## CHAPTER III

AMENDMENTS TO THE MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002.

Amendment of section 11 of Mah. IX of 2005.

**9.** In section 11 of the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (hereinafter, in this Chapter, referred to as "the Value Added Tax Act"), for sub-section (*3*), the following sub-sections shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 1st April 2017, namely :— Mah. IX of 2005.

"(*3*) Every member of the Tribunal shall be a person, who,—

(*i*) is or has been, a Judge of the High Court, or

(*ii*) is or has been, a District Judge, or

(*iii*) is qualified for appointment as a District Judge, and has held Judicial Office for not less than ten years, or

(*iv*) (*a*) has, for a continuous period of not less than two years held office, not below the rank of Joint Commissioner of Sales Tax or, as the case may be, Joint Commissioner of State Tax and has dealt with quasi-judicial proceedings, or

(*b*) is retired and has before his retirement held office not below the rank of Joint Commissioner of Sales Tax or, as the case may be, Joint Commissioner of State Tax and had before his retirement dealt with quasi-judicial proceedings, or

(*c*) is retired and before his retirement has held office as member of the Tribunal.

*Explanation*.—For the purposes of this sub-section, "quasi-judicial proceedings" shall include assessment, audit or appeal proceedings.

(*3A*) (*a*) The members, specified in clause (*i*), (*ii*) or (*iii*) shall be appointed or re-appointed by the State Government after consultation with the High Court of Judicature at Bombay.

(*b*) The member, specified in clause (*iv*), shall be appointed or re-appointed by the State Government on the recommendations of a Selection Committee, constituted in the prescribed manner.

(*3B*) The terms of office of the member of the Tribunal shall be such as may be prescribed. The member shall hold office for such period, as may be prescribed or as the State Government may, by special order in his case, specify.".

Amendment of section 31 of Mah. IX of 2005.

**10.** In section 31 of the Value Added Tax Act,—

(*1*) in sub-section (*1*), in clause (*b*), in sub-clause (*i*), after the words "amount payable" the words, figures and letters "upto the 31st December 2018" shall be inserted;

(*2*) in sub-section (*4*), the following proviso shall be added and shall be deemed to have been added with effect from the 1st July 2017, namely :—

"Provided that, any amount paid by an employer, in accordance with the provisions of this section to the credit of the State Government during the period starting on or after the 1st July 2017 and ending on the 31st December 2018, may be claimed as credit in the prescribed manner and subject to the prescribed conditions, by the person making the supply to the employer or the concerned sub-contractor (if any).".

11. In section 32A of the Value Added Tax Act, in sub-section (2), in the *Explanation*, for the words "dues which are rupees one hundred or less" the words "tax, which is rupees five hundred or less, per order or, as the case may be, per period and the interest payable thereon" shall be substituted. Amendment of section 32A of Mah. IX of 2005.

12. In section 59 of the Value Added Tax Act, in sub-section (1), in the proviso, for the words "Thane and Raigad District" the words "Thane, Palghar and Raigad Districts" shall be substituted. Amendment of section 59 of Mah. IX of 2005.

13. In section 61 of the Value Added Tax Act, after sub-section (1), before *Explanation-I*, the following proviso shall be inserted, namely :— Amendment of section 61 of Mah. IX of 2005.

"Provided that, for the year 2017-18, the provisions of this sub-section shall be applicable to a dealer, whose registration is deemed to have been cancelled under sub-section (6A) of section 16, if the,—

(a) aggregate of his turnover of sales and the value of goods transferred to any other place of his business or of his agent or principal, situated outside the State, not by reason of sale, or

(b) turnover of purchases,

exceeds rupees twenty five lakh.".

14. In section 85 of the Value Added Tax Act, in sub-section (2),— Amendment of section 85 of Mah. IX of 2005.

(1) in clause (i), for the word and figures "section 26." the words and figures " section 26, or" shall be substituted;

(2) after clause (i), the following clause shall be added, namely :—

"(j) any order, published by the Commissioner, by virtue of the powers conferred on him by notification issued under section 26B.".

## CHAPTER IV

### AMENDMENT TO THE MAHARASHTRA GOODS AND SERVICES TAX ACT, 2017.

Mah. XLIII of 2017. 15. In section 3 of the Maharashtra Goods and Services Tax Act, 2017, for clause (f), the following clauses shall be substituted, namely :— Amendment of section 3 of Mah. XLIII of 2017.

"(f) Assistant Commissioners of State Tax,

(f-1) State Tax Officers, and".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ४, अंक ११५] बुधवार, सप्टेंबर, १२, २०१८/भाद्र २१, शके १९४० [पृष्ठे ११, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ३२३

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**वित्त विभाग,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ सप्टेंबर, २०१८.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२.**

क्रमांक-मूवक-१५१८/प्र.क्र.३२/कराधान-१.- ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची अशी खात्री झाली आहे की, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ मध्ये तात्काळ सुधारणा करण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली आहे, आणि त्यामुळे महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (२००५ चा महा. ९) च्या कलम ८३ च्या पोट-कलम (४) च्या परंतुकानुसार सदर नियमांना पूर्व प्रसिद्धी देण्याची अट पाळण्याची गरज नाही;

म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ८३ च्या उप-कलम (४) च्या परंतुकासह, उप-कलमे (१),(२) आणि (३) च्या शक्तींचा वापर करून तसेच यासंदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ मध्ये आणखी सुधारणा करीत आहे, म्हणजेच :-

१. या नियमांना महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (दुसरी सुधारणा) नियम, २०१८ असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ (यापुढे "मुख्य नियम" असे संबोधण्यात येईल) च्या नियम ६ मध्ये,-

(१) सध्या अस्तित्वात असलेल्या समास टिपे ऐवजी खालील दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :-

**"न्यायाधिकरणाच्या सदस्यांच्या निवडीकरिता निवड समिती गठित करणे आणि न्यायाधिकरणाच्या सदस्यांची अर्हता व पदावधी";**

(२) उप-नियम (१) ऐवजी खालील दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच:-

"(१) (क) निवड समिती पुढीलप्रमाणे असेल, म्हणजेच:-

| | |
|---|---|
| (एक) मुंबई उच्च न्यायालयाशी सल्लामसलत करुन, राज्य शासनाने, नामनिर्देशित केलेले मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश; | ---- अध्यक्ष; |
| (दोन) महाराष्ट्र शासनाच्या, सामान्य प्रशासन विभागाचे, अपर मुख्य सचिव; | ---- सदस्य; |
| (तीन) महाराष्ट्र शासनाच्या, वित्त विभागाचे, अपर मुख्य सचिव; | ---- सदस्य; |
| (चार) महाराष्ट्र शासनाच्या, विधी व न्याय विभागाचे, प्रधान सचिव किंवा सचिव; | ---- सदस्य. |

(ख) सह सचिव किंवा, यथास्थिती, उप सचिव, वित्त विभाग हे उक्त निवड समितीचे संयोजक असतील.

(१क) कलम ११ च्या पोट-कलम (३) च्या खंड (चार) मधील उप-खंड (क), (ख) किंवा, यथास्थिती, (ग) मध्ये विनिर्दिष्ट केलेली व्यक्ती त्याची न्यायाधिकरणाचा सदस्य म्हणून नेमणूक करण्यासाठी कलम ११ च्या पोट-कलम (३क) च्या खंड (ख) अन्वये स्थापित झालेल्या निवड समितीकडे नमुना ११० मध्ये अर्ज करेल :

परंतु असे की, कलम ११ च्या पोट-कलम (३) च्या खंड (चार) मधील उप-खंड (ख) खाली समाविष्ट असलेल्या व्यक्तीने तिच्या निवृत्तीच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीनंतर असा अर्ज केला असेल तर तो विचारात घेतला जाणार नाही :

परंतु आणखी असे की, कलम ११ च्या पोट-कलम (३) च्या खंड (चार) मधील उप-खंड (ग) खाली समाविष्ट असलेल्या व्यक्तीने तिच्या निवृत्तीच्या दिनांकापासून बारा महिन्याच्या कालावधीनंतर असा अर्ज केला असेल तर तो विचारात घेतला जाणार नाही.

(१ख) (क) कलम ११ च्या पोट-कलम (२) अन्वये नियुक्त झालेला अध्यक्ष, त्याच्या नियुक्ती किंवा, यथास्थिती, पुनर्नियुक्ती पासून दोन वर्षापर्यंत किंवा तो वयाची पासष्ट वर्ष पूर्ण करेल यापैकी जे आधी घडेल तो पर्यंतच्या मुदतीसाठी पद धारण करेल.

सुधारणा क्र. २८/५ दि. २३/१०/२०१८ च्या सुधारणानुसार

(ख) कलम ११ च्या पोट-कलम (३) च्या खंड (चार) च्या उप-खंड (क) अन्वये नियुक्त झालेला सदस्य, अध्यक्ष वगळून, त्याच्या नियुक्ती किंवा, यथास्थिती, पुनर्नियुक्ती च्या दिनांकापासून दोन वर्षापर्यंत किंवा तो वयाची बासष्ट वर्ष पूर्ण करेल यापैकी जे आधी घडेल तो पर्यंतच्या मुदतीसाठी पद धारण करेल :

परंतु असे की, हा उप-नियम लागू झाल्याच्या दिनांकापूर्वी झालेल्या सदस्याच्या पुनर्नियुक्तीवर या खंडातील कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही.

(ग) कलम ११ च्या पोट-कलम (३क) च्या खंड (ख) अन्वये नियुक्त झालेला सदस्य, त्याच्या नियुक्ती किंवा, यथास्थिती, पुनर्नियुक्ती पासून दोन वर्षापर्यंत किंवा तो वयाची साठ वर्ष पूर्ण करेल यापैकी जे आधी घडेल तो पर्यंतच्या मुदतीसाठी पद धारण करेल.";

(३) उप-नियम (२) मध्ये, "खंड (ड)" या शब्द, कंस आणि अक्षरा ऐवजी "कलम ११ च्या पोट-कलम (३क) च्या खंड (ख) " हे शब्द, अंक, कंस आणि अक्षरे दाखल करण्यात येत आहेत ;

(४) उप-नियम (३) मध्ये,-

(क) खंड (ब) नंतर, खालील खंड दाखल करण्यात येत आहेत, म्हणजेच :-

"(ब१) त्यास एखाद्या गुन्ह्याबद्दल दोषी ठरविले गेले असेल, ज्यात राज्य शासनाच्या मते नैतिक अध:पतन समाविष्ट आहे, किंवा

(ब२) असे आर्थिक किंवा अन्य हितसंबध संपादित केले असतील ज्यामुळे सदस्य म्हणून करावयाच्या कार्यास बाधक ठरणारे परिणाम होतील, किंवा

(ब३) त्याच्या पदाचा असा गैरवापर केला असेल ज्यामुळे त्याचे पदस्थ राहणे जनहितास बाधक ठरेल.";

(ख) खंड (क) नंतर खालील परंतुके दाखल करण्यात येत आहेत, म्हणजेच :-

"परंतु असे की, वरील कोणत्याही विनिर्दिष्ट कारणास्तव, सदस्याच्या पदावधीची समाप्ती, त्यास त्याच्या विरुध्द असलेले दोषारोप कळविल्याशिवाय आणि त्यास आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याशिवाय करता येणार नाही:

परंतु आणखी असे की, राज्य शासनाकडून मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशाकडे संदर्भ दाखल झाल्यावर त्यासंबधी त्याने नामनिर्देशित केलेल्या विद्यमान उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाने चौकशी केल्या नंतर या उप-नियमामध्ये विनिर्दिष्टीत सिद्ध झालेल्या कारणावर आधारित असा आदेश राज्य शासनाने काढल्या शिवाय न्यायाधिकरणाच्या सदस्याची नियुक्ती समाप्त होणार नाही.";

(५) उप-नियम (५) नंतर, खालील उप-नियम दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच:-

"(६) सदस्य त्याच्या पद समाप्ती नंतर दोन वर्षाच्या कालावधीसाठी न्यायाधिकरणा समोर उपस्थित राहण्यास, कार्य करण्यास किंवा वकिली करण्यास पात्र असणार नाही.".

३. मुख्य नियमांस जोडलेल्या नमुना १०९ नंतर, खालील नमुना दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच:-

**"नमुना ११०**

(नियम ६ चा उप-नियम (१क) पहा)

महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ च्या कलम ११ अन्वये न्यायाधिकरणाचा सदस्य म्हणून नियुक्ती/पुनर्नियुक्तीसाठी अर्ज.

प्रति,
निवड समिती,
महाराष्ट्र राज्य,
द्वारा, उप सचिव (कराधान-१),
वित्त विभाग (संयोजक),
५ वा मजला, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०००३२.

**विषय :-** महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणाचा सदस्य म्हणून नियुक्ती/पुनर्नियुक्तीसाठी अर्ज.

महोदय,

मी, खाली स्वाक्षरी करणार, याद्वारे महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणाचा सदस्य म्हणून नियुक्ती व्हावी अशी इच्छा दर्शवित आहे. माझी माहिती खालील प्रमाणे आहे :-

| | |
|---|---|
| १. नाव | |
| २. सध्याचे पदनाम (योग्य ते निवडा) | ☐ राज्यकर सह आयुक्त<br>☐ अपर राज्यकर आयुक्त<br>☐ निवृत्त राज्यकर सह आयुक्त / अपर राज्यकर आयुक्त<br>☐ न्यायाधिकरणाचा निवृत्त सदस्य |
| ३. निवासी पत्ता | |
| ४. जन्म तारीख | |
| ५. विक्रीकर/राज्यकर विभागात रुजू झाल्याचा दिनांक | |
| ६. महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणात रुजू झाल्याचा दिनांक (जर पुनर्नियुक्तीसाठी अर्ज करत असेल तर) | |
| ७. या पदावरील पदोन्नतीचा दिनांक<br>क) विक्रीकर/राज्यकर सह आयुक्त | |
| ख) अपर विक्रीकर/राज्यकर आयुक्त | |
| ८. विक्रीकर/राज्यकर विभागातून निवृत्त झाल्याचा दिनांक | |
| ९. महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणातून निवृत्त झाल्याचा दिनांक (जर पुनर्नियुक्तीसाठी अर्ज करत असेल तर) | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०. धारण केलेली पदे (न्यायिकवत पदांवर भर) | धारण केलेले पद | कार्यालयाचे नाव | कालावधी | |
| | | | वर्ष | महिने |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| ११. मागील ५ वर्षातील वार्षिक गोपनीय अहवालांची प्रतवारी (प्रती जोडाव्यात) | वर्ष | प्रतवारी | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| १२. इतर कोणतीही कामगिरी (बक्षिसे, प्रमाणपत्रे, इ.) (प्रती जोडाव्यात) | | | | |

मी, याद्वारे गांभीर्यपूर्वक नमूद करतो की, सदस्य म्हणून कार्य करण्यास बाधक होतील असे माझे कोणतेही आर्थिक किंवा इतर हितसंबंध नाहीत.

दिनांक: आपला विश्वासू

स्वाक्षरी:-

ठिकाण: अर्जदाराचे नाव:- .".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज. वि. दिपटे,**
शासनाचे उप सचिव.

**FINANCE DEPARTMENT**

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,

Mantralaya, Mumbai 400 032, dated 12th September 2018.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002.

No. VAT-1518/CR-32/Taxation-1.—Whereas, the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to take immediate action further to amend the Maharashtra Value Added Tax Rules, 2005 and to dispense with the condition of previous publication thereof under the proviso to sub-section *(4)* of section 83 of the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (Mah. IX of 2005);

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections *(1)*, *(2)* and *(3)* read with the proviso to sub-section *(4)* of section 83 of the said Act, and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, makes the following rules further to amend the Maharashtra Value Added Tax Rules, 2005, namely:-

**1.** These rules may be called the Maharashtra Value Added Tax (Second Amendment) Rules, 2018.

**2.** In rule 6 of the Maharashtra Value Added Tax Rules, 2005 (hereinafter referred to as "the principal Rules"),-

(1) for the existing marginal note, the following shall be substituted, namely:-

"**Constitution of a Selection Committee and terms of office of the members of Tribunal:**";

(2) for sub-rule (1), the following shall be substituted, namely:-

"(1) (a) The Selection Committee shall consist of the following, namely:-

| | |
|---|---|
| (i) Retired High Court Judge of the High Court of Judicature at Bombay nominated by the State Government, in consultation with the High Court of Judicature at Bombay; | ---- Chairperson; |
| (ii) Additional Chief Secretary, General Administration Department, Government of Maharashtra; | ---- Member; |
| (iii) Additional Chief Secretary, Finance Department, Government of Maharashtra; | ---- Member; |
| (iv) Principal Secretary or Secretary, Law and Judiciary Department, Government of Maharashtra; | ---- Member. |

(b) The Joint Secretary or, as the case may be, Deputy Secretary, Finance Department shall be the Convener of the said Selection Committee.

(1A) The person, specified in sub-clause *(a)*, *(b)* or, as the case may be, *(c)* of clause *(iv)* of sub-section *(3)* of section 11, shall make an application for appointment as member of the Tribunal in the Form 110 to the Selection Committee constituted under sub-rule *(1)* in pursuance of clause *(b)* of sub-section *(3A)* of section11:

Provided that, no such application shall be entertained from a person covered under sub-clause *(b)* of clause *(iv)* of sub-section *(3)* of section 11, after a period of six months from the date of his retirement:

Provided further that, no such application shall be entertained from a person covered under sub-clause *(c)* of clause (iv) of sub-section *(3)* of section 11, after a period of twelve months from the date of his retirement.

(1B) (a) The president, appointed under sub-section *(2)* of section 11, shall hold office for a term of two years from the date on which he is so appointed or, as the case may be, re-appointed or until he attains the age of sixty-five years, whichever is earlier.

(b) A member appointed under sub-clause *(a)* of clause *(iv)* sub-section *(3)* of section 11, other than the President, shall hold office for a term of two years from the date on which he is so appointed or, as the case may be, re-appointed or until he attains the age of sixty-two years, whichever is earlier:

Provided that, nothing in this clause shall affect the re-appointment of a member which is made before the date of effect of this sub-rule.

(c) A member appointed under clause *(b)* of sub-section *(3A)* of section 11, shall hold the office for a term of two years from the date on which he is so appointed or, as the case may be, re-appointed or until he attains the age of sixty years, whichever is earlier.";

(3) in sub-rule *(2)*, for the word, brackets and letter "clause *(d)*" the words, bracket, letters and figures "under clause *(b)* of sub-section *(3A)* of section 11" shall be substituted;

(4) in sub-rule (3),-

(a) after clause *(b)*, the following clauses shall be added, namely:-

"*(b1)* has been convicted of an offence which, in the opinion of the State Government involves moral turpitude, or

*(b2)* has acquired such financial or other interest as is likely to affect prejudicially his functions as a Member, or

*(b3)* has so abused his position as to render his continuance in office prejudicial to the public interest.";

(b) after clause *(c)* the following provisos shall be added, namely:-

"Provided that, a member shall not be terminated on any of the grounds specified herein above, unless he has been informed of the charges against him and has been given an opportunity of being heard:

Provided further that, the appointment of a member of the Tribunal shall not be terminated unless an order is made by the State Government on the basis of proved ground specified in this sub-rule, after an inquiry made by a sitting Judge of High Court nominated in this behalf, by the Chief Justice of the High Court of Judicature at Bombay on a reference made to him by the State Government.";

(5) after sub-rule (5), the following sub-rule shall be added, namely:-

"(6) A member, on ceasing to hold his office, shall not be eligible to appear, act or plead before the Tribunal for a period of two years.".

**3.** After Form 109 appended to the principal Rules, the following Form shall be inserted, namely :—

**"Form 110**

(See sub-rule (1A) of rule 6)

Application for appointment/re-appointment as a member of the Tribunal under section 11 of the Maharashtra Value Added Tax Act, 2002.

To

The Selection Committee,

Maharashtra State,

c/o Deputy Secretary (Taxation-1),

Finance Department (Convener),

5th Floor, Mantralaya,

Madam Cama Marg,

Hutatma Rajguru Chowk,

Mumbai- 400032.

Sub:- Application for appointment/re-appointment as member of the Maharashtra Sales Tax Tribunal.

Sir,

I, the undersigned, do hereby indicate my willingness for appointment as a member of Maharashtra Sales Tax Tribunal. My details are as under:—

| | |
|---|---|
| 1. Name | |
| 2. Present Designation (select whichever is applicable) | ☐ Joint Commissioner of State Tax<br>☐ Additional Commissioner of State Tax<br>☐ Retired Joint Commissioner of State Tax/ Additional Commissioner of State Tax<br>☐ Retired Tribunal Member |
| 3. Residential Address | |
| 4. Date of Birth | |
| 5. Date of joining the Department of Sales Tax/State Tax | |
| 6. Date of joining Maharashtra Sales Tax Tribunal (if applying for re-appointment) | |
| 7. Date of promotion to the post of<br>a) Joint Commissioner of Sales Tax/State Tax | |
| b) Additional Commissioner of Sales Tax/State Tax | |
| 8. Date of retirement from Department of Sales Tax/State Tax | |
| 9. Date of retirement from Maharashtra Sales Tax Tribunal (if applying for re-appointment) | |

| 10. Postings held (emphasis on quasi-judicial postings) | Post held | Name of office | Duration | |
|---|---|---|---|---|
| | | | Year | Month |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

| 11. Gradation of last 5 years annual confidential reports (copies to be enclosed) | Year | Gradation |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

| 12. Any other achievements (rewards, certificates, etc.) (copies to be enclosed) | |
|---|---|

I, hereby solemnly state that, I do not have any financial or other interests which are likely to prejudicially affect my functions as a Member.

Date: Yours faithfully
Signature:-

Place: Name of the applicant:- ".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

J. V. DIPTE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ४, अंक १३६(२)     मंगळवार, ऑक्टोबर २३, २०१८/कार्तिक १, शके १९४०     पृष्ठे २, किंमत [redacted]

असाधारण क्रमांक ३८५

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### वित्त विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ ऑक्टोबर २०१८.

### शुद्धिपत्र

क्रमांक मूवक-१५१८/प्र.क्र. ३२/कराधान-१.—**महाराष्ट्र शासन राजपत्र,** दिनांक १२ सप्टेंबर २०१८, असाधारण भाग चार-ब, असाधारण क्र. ३२३, पृष्ठ क्रमांक १ ते ११ वर प्रसिद्ध करण्यात आलेल्या शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक मूवक-१५१८/प्र. क्र. ३२/कराधान-१, दिनांक १२ सप्टेंबर २०१८ मध्ये, पृष्ठ क्रमांक ३ वर, ओळ क्रमांक ४ मध्ये, " पोट-कलम (३) च्या खंड (चार) च्या उप-खंड (क) " **याऐवजी** " पोट-कलम (३क) च्या खंड (क) " असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ज. वि. दिपटे,
शासनाचे उप सचिव.

## FINANCE DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 23rd October 2018.

*CORRIGENDUM*

No. VAT-1518/CR-32/Taxation-1.— In the Government Notification, Finance Department, No. VAT-1518/CR-32/Taxation-1, dated the 12th September 2018, published in the *Maharashtra Government Gazette*, Extraordinary No. 323, Extraordinary Part IV-B, dated the 12th September 2018, at pages 1-11, on page 8, in line 16, *for* " sub-clause (*a*) of clause (*iv*) sub-section (*3*) *read* "clause (*a*) of sub-section (*3A*)".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

J. V. DIPTE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS